Review Of Research
Vol. 3 | Issue. 12 | Sept. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# पालोफकिर - गंभीर समस्येचे सामाजिक नाटक

**प्रा. डॉ. नामदेव विठ्ठल गवळी**
**मराठी विभाग, आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वैभववाडी,**
**जिल्हा सिंधुदूर्ग, महाराष्ट्र.**

मराठी नाट्य इतिहासाचा प्रचंड कालावधी विचारात घेता बोलीतील नाट्य लेखनाची परंपरा अत्यल्प असल्याचे निदर्शनाला येते. मराठी नाटकात बोलीचा तुरळक वापर आढळत असला तरी तो सामान्यता विनोदनिर्मितीसाठी होत होता. 'ललाटलेख' या गाजलेल्या नाटकाचे लेखन कदम यांनी पिटा या पात्राच्या तोंडी मालवणी संवाद घातला आहे. शाहीर साबळे यांच्या 'आंदोलन' या वगनाट्यातला पोलीस मालवणी बोलीत बोलून लोकांना हसवतो, अशाप्रकारे विनोदी संवादासाठी मालवणी भाषेचा वापर काही नाटककरांनी केल्याचे दिसते.

सुरुवातीच्या काळात आबासाहेब आचरेकर या कामगार रंगभूमीवरील नाटककाराने 'गाववाले हसतील' हे संपूर्ण मालवणी बोलीतील नाटक लिहून सादर केले होते. मात्र त्याचे प्रयोग कामगारापुरतेच मर्यादित राहिले. पुढे गंगाराम गवाणकर या नाटककाराने आणि मच्छिंद्र कांबळी या नटाने मालवणी बोलीतील नाटकाकडे पाहण्याची दृष्टी बदलली, 'वस्त्रहरण' हे नाटज याबाबत प्रारंभबिंदू मानावे लागेल. "या नाटकातील सर्वच पात्रांनी मालवणी बोलीचे विविध विभ्रम व्यक्त केले. तात्या या पात्राचे मालवणी बोलीतील संवाद हास्याची कारंजी उडवतात. मालवणी नाटकातून मुंबईत 'चाकरी' मुळे राहणा-या मालवणी माणसांचे, त्यांच्या समस्यांचे दर्शन घडविले."[१] त्याचप्रमाणे दक्षिण कोकणात राहणा-या मालवणी समस्यांचे दर्शन घडविले. उदा. चाकरमानी (१९८२), घुमशान (१९८४) खुनाची गजाल (१९८४), खानावळ (१९८५), केला तुका झाला माका (१९८३), मालवणी प्रदेशातील अंधश्रद्धा, देवदेवस्कीवर प्रखर दर्शन घडविणारी पालोफकीर (१९८२), भगत चाळो पोटात गोळो (१९८२), याशिवाय 'करतलो तो भोगतलो' (१९९३), 'नशिबवान घोव खावचो (१९८६), पांडगो इला रे बा इलो (१९८७), येवा कोकण तुमचाच आसा (१९९६) या नाटकांनी मालवणी रंगभूमीला प्रतिष्ठा मिळवूण दिली.

सुंदर तळाशिलकर हे व्यवसायाने आणि वृत्तीने नट होते. त्यांनी 'जुळा गोंधळ', 'काचेचा चंद्र', 'नटसम्राट' अशा अनेक नाटकात भूमिका केलेल्या आहेत. नाटककार म्हणून त्यानी १९६३ साली 'सोनी' या नावाने पहिले मराठी नाटक लिहिले. त्यानंतर बोलीभाषेतील नाट्यमयता, त्यातील गोडवा लक्षात आल्यानंतर मालवणी श्रृतीकेचे लेखन केले. 'आये मी वचन देतय', अंदाजपंचे', 'चाकरमानी', 'शल्लीपाळी', 'चेडू माझा पांगळा', 'झिल म्हणू नये आपलो', 'उबो रव खळ्यात' या मालवणी श्रृतिका रेडिओ वर सादर झाल्या. श्रोत्यांकडून त्यांचे कौतुकही झाले. त्यातूनच संपूर्ण तीन अंकी मालवणी नाटक लिहिण्याचे तळशिलकरांना प्रोत्साहन मिळाले. 'चाकरमानी' हे सुंदर तकाशिलकर यांचे संपूर्ण मालवणी बोलीतील पहिले नाटक होय. त्यानंतर त्यांनी 'चालगती' या मालवणी नाटकाचे लेखन केले आहे.

कोकणातील माणसांचे स्वभाव, त्यांच्यातील बेदरकारपणा, लोचटपणा, रिकामटेकडेपणा, आळस, अंधविश्वास, सच्चेपणा याचे दर्शन तळाशिलकर यांनी या नाट्यकृतीच्या माध्यमातून घडविले आहे.
" 'पालोफकीर' (१९८२) हे सुंदर तळाशिलकर यांचे हसता-हसता गंभीर बनवून, मनाचा थरकाप करून टाकणारं, एक आगळवेगळं मालवणी नाटक आहे."[२] एकूण चौदा प्रमुख पत्रकारांबरोबरच गावगाड्यातील घाडी, गुरव, महार आणि इतर गावकरी यांचा सहभाग या नाटकात आहे.

'पालोफकीर' या नाटकाची पार्श्वभूमी सांगताना नाटकाच्या सुरुवातीलाच नाटककाराने या नाटकाची, कथावस्तू मागची पार्श्वभूमी सांगीतली आहे.

" 'कोकणात एखाद्या विध्वेनं पुर्नविवाह केला की, त्या विवाहाला 'पाट लावणे' असे म्हणतात. 'पाट' हा एखाद्या विधुराशीच लावला जातो. या पाटात ब्राह्मण, अंतरपाट, मंगलष्टके वैगरे काही नसतं. गांवकार, घाडी, महार वगैरे मंडळी गा-हाणे करतात. ते गा-हाणंदेखील देवाला केलं जात नाही. त्या विध्वेच्या पहिल्या नव-याला जो पिशाच्च योनीत वावरत असतो, त्याला कोकणातील लोकं 'पालोफकीर' म्हणतात."[३] त्याला केले जाते. पाटाच्या वेळी वधू लाल पातळ नेसते. विधवा बायका तिची ओटी भरतात. सुवासिनी त्या पाटाला हजर नसतात पहाटेपूर्वीच्या काळोखात, कोंबडा आरवण्यापूर्वी हा विवाह पार पाडला जातो. या संपूर्ण प्रकारात उत्साह-आनंदाऐवजी एक प्रकारची भयानकता आलेली असते. ही पद्धत अलीकडे जवळ जवळ बंद झाली आहे. ही झाली 'पाट लावणे' ह्या विवाह प्रकाराची माहिती. पण हे नाटक म्हणजे 'काशी' नावाच्या दुर्दैवी स्त्रीच्या जीवनाची शोकांतिका आहे, "समाजातील अनिष्ट प्रथा, रूढी, अंधश्रद्धा यांच्यामुळे भारतीय समाजात स्त्रियांवर जगत असताना जे भयानक प्रसंग येतात त्यांना परिस्थितीनुसार स्त्रिया तोंड देतात. पण समाज अशा स्त्रियांचे जीवन असह्य करतो. यांचे दर्शन या नाटकातून घडते."[४] दादू, त्याची पत्नी गोकळा व भाऊ विश्वनाथ असं एक कुटुंब मालवणी मुलुखातल्या एका खेड्यात राहत असते. विश्वनाथ मुंबईत नोकरीच्या निमित्ताने जातो. एक दिवस दादू 'आपण आजारी असल्याची' खोटी तार करूण त्याला गावी बोलवितो. व तरूण हसतमुखत काशीची जबरद्स्तीने लग्न लावून देतो. विश्वनाथला ते पटत नाही. रागाने लग्नाच्या दुस-या दिवशी तो मुंबईला जातो. आईबापाविना मामाकडे पूर्वी असलेल्या 'काशी' दुःखी कष्टी होते. खरं तर तिच्या जीवनाच्या शोकांतिकेची ही सुरुवात. तिच्या भावनेचा चक्काचूर होतो. गावातील इतर माणसही तिच्या भावनेशी खेळतात. जीवन असह्य करतात. (उदा. शुल्लक गोष्टींवरून भांडण करणारी भावजय गोकळा, लावालावी करणारा संभा आणि आपली चुक लक्षात आल्यावर हतबल झालेला दादू) पण काशी हळूहळू सावरते. आपल्या नव-याचे मुंबईत दुस-या बाईशी संबंध आहेत हे तिला समजते तेव्हा ती विचारते... "निदान तेनी तरी तुमका सांगाक होया होता, तेंचा जर मन दुसरीकडे होता, तर कित्या तेनी माझ्या आयुष्याचे इदवास केल्यानी?" पण नाटकाला, पुढे आगळे वेगळे मिळते. मुंबईहून येणा-या तारेमुळे 'एका रेल्वे अपघातात विश्वनाथ मृत्यू पावला' अशी समजूत होऊन चार महिन्यांतच काशी विधवा बनते. पुढे गावातील रिकामटेकडा संभा तिच्याशी वाईट हेतूने सलगी करतो. गोकुळा घरात त्रास द्यायला सुरुवात करते. शेवटी घराण्याची अब्रु नको व 'काशी' ला संसारसुख मिळावे म्हणून दादू पश्चातापाने तिचे दुसरे लग्न करण्याचा निर्णय घेतो. दुर-या लग्नाला नकार देणा-या काशीला घरात ठेवणार नाही अशी धमकी नाइलाजाने दिली जाते काशी लग्नास तयार होते.

दुस-या अंकात दादूच्या घरी 'साबा', 'कल्याण' आणि 'आबा' हे तीन विधुर काशीला पहायला येतात. पैकी साठी उलटलेल्या दमेकरी 'कल्याण' शी एका निर्जन स्थळी 'पाट' पद्धतीने लग्न होते पद्धतीप्रमाणे मृत नवरा विश्वनाथ म्हणजेच पिशाच्च बनलेला 'पालोफकीर' याला गा-हाणे घातले जाते. सुरुवातीलाच सांगितलेल्या पद्धतीप्रमाणेच हा कारूण्यमय विवाह रंगभूमीवर दाखविला जातो. लग्न होवून काशी कल्याणच्या घरी जाते. पुढे आजारी पडलेल्या कल्याणला दादू, गोकळा, बाबी जातात. तेव्हा कल्याणची थोरली विधवा बहीण आका काशीला अनेक प्रकारे त्रास देत असल्याचे समजते.

सांबा तिला तिचा नवरा विश्वनाथ 'पालोफकीर' बनून तुझा गळा दाबून खून करेल असे सांगून घाबरतो व तू रामनाम जप कर व काशीला सुखाने संसार करू दे असे आकाला सांगतो.

शेवटच्या अंकात या नाटकाला थरारक वळण मिळते. 'दादू', 'गोकळा' काशीकडे असतानाच त्यांच्या शोधात विश्वनाथ येतो. तो 'पालोफकीर' आहे असे समजून गावात घबराट निर्माण होते. एकदा तर तो आकाला दिसतो. त्यामुळे ती बेशुद्ध पडते. या सर्व प्रकारांमुळे काशीची मनःस्थिती बिघडते. गावातील इतर लोकांनाही तो दिसल्याने 'पालोफकीर' समजून ते त्याच्या मागे लागतात. दगड धोंडे मारून रंक्तबंबाळ करतात. इतक्यात संबा दादूच्या गावातून येतो आणि सांगतो की, विश्वनाथ जिवंत आहे. तो गावी आला. तुम्ही सर्व काशीकडे आला हे समजून तो इकडे आला. गावातही आणि इथेही 'पालोफकीर' समजून त्याला मारत आहे हे समजून दादूला धक्काच बसतो. इतक्यात रक्तबंबाळ झालेला कपडे फाटलेला विश्वनाथ कल्याणच्या घरीच येतो. तो सांगतो, "मी रेल्वे अपघातात मेलो नाही. तर माझे चोरीला गेलेले पाकीट ज्याच्या खिशात असते तो माणूस अपघातात मृत्यू पावतो. परंतु पाकिटातील पत्ता व फोटोमुळे पोलिस, 'झिलग्यांच्या खोलीवर' गेले. तेथे केशव होतो. मी दोन महिन्यांपूर्वीच खोली सोडून त्या बाईबरोबर बाहेर गावी राहत होतो. त्यामुळे केशवलाही प्रेताची ओळख पटू शकली नाही. केवळ ओळखपत्रावरून मीच मेलो असे समजून त्याने तुम्हाला तार केली" हा सारा प्रकार त्या बाईशी भांडण झाल्यामुळे पुन्हा खोलीवर आलेल्या विश्वनाथाला समजतो. आणि केशवाने तार केल्याची समजल्याने तो गावी येतो. गावी आल्यावर लोकांना मी 'पालोफकीर'च वाटलो. तुमच्या शोधात मी इकडे आलो तर इथेही लोकांनी मला मारले. माझे कपाळ फुटले मी आता मरणार. काशीने मला माफ करावे. अति दुःखामुळे आणि या भयानक प्रसंगामुळे काशी बाधिर झालेली असते. आणि अति मारामुळे मृत्यूकडे वाटचाल करणारा विश्वनाथ "मी जिवंत आहे. मी 'पोलोफकीर' नाही असे सांगताच मान टाकतो. दादू टाहो फोडतो तर या नाटकाची नायिका 'काशी' शून्य नजरेने पाहत असतानाच हे नाटक संपते. "

इतर व्यवसायिक मालवणी नाटकांत मनोरंजन व विनोद यावर भर दिलेला असतो, त्यामुळे हलकाफुलका विषय नाटककार निवडतात. तळशिलकरांनी आबासाहेब आचरेकरांच्या गांववाले हसतील या नाटकानंतर प्रथमच करूणप्रधान नाटक मालवणी बोलीत लिहिले जाऊ शकते हे सिद्ध केले. या दृष्टीनेही या नाटकाला महत्त्वाचे स्थान आहे. गतिमान प्रसंग, दृश्यात्मकता, गंभीर वातावरण निर्मिती व मालवणी व्यक्तिचित्रे रेखाटण्यात हे नाटक यशस्वी ठरते.

**संदर्भ**

१) सतिश कामत, साहित्य : आशय आणि आविष्कार, शब्दालय प्रकाशन, पृ. १६८.
२) सुदंर तळाशिलकर, पालोफकीर, अप्रकाशित १९८२.
३) लळीत बाळकृष्ण मराठी रंगभूमीवरील नाटकांची समीक्षा. पृ. ६७
४) तत्रैव. पृ. ६९